**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलै पासून, २३ जुलै रोजी सादर होणार अर्थसंकल्प

- देशांतर्गत बाजारात कांद्याची पुरेशी उपलब्धता असल्याची केंद्र सरकारची ग्वाही

- मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण दिलं नाही तर राजकीय भूमिका घेण्याचा मनोज जरांगे पाटील यांचा सरकारला इशारा

**आणि**

- झिम्बाब्वे विरुद्धच्या टी ट्वेंटी सामन्यात भारताची खराब सुरुवात

**<><><><><><>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलैपासून सुरू होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन २३ जुलै रोजी चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करतील. १२ ऑगस्टपर्यंत हे अधिवेशन सुरू राहणार असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू यांनी दिली आहे. तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प आहे.

**<><><><><><>**

वाहन उद्योग क्षेत्रात गेल्या दहा वर्षांत भारतानं जपानला मागे टाकले आहे. देशाच्या वाहन उद्योगाची उलाढाल ७ लाख कोटींवरून २० लाख कोटींवर पोहचली आहे. येत्या काळात ही उलाढाल ५० लाख कोटींवर पोहचविण्याचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केले. नागपुरात एका कंपनीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राज्यात सेमिकंडक्टरचा प्रकल्प यावा यासाठी काही कंपन्यांसोबत चर्चा सुरू असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमात सांगितलं.

<><><><><>

रब्बी हंगामातल्या कांद्याची बाजारातली आवक वाढत असल्यामुळे कांद्याचे दर स्थिर होत असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं सांगितलं. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कांंद्याचं उत्पादन कमी होऊनही देशातल्या बाजारात कांद्याची पुरेशी उपलब्धता आहे. त्याचबरोबर यंदाच्या रब्बी हंगामात कांद्याचं अंदाजित उत्पादन १९१ लाख टन असून देशातल्या ग्राहकांची गरज भागवण्यासाठी ते पुरेसं  आहे, अशी माहितीही या मंत्रालयानं दिली आहे. यंदा तीन लाख ६१ हजार हेक्टर परिसरात खरिपातल्या कांद्याची लागवड करायचं उद्दिष्ट असून ते गेल्या वर्षीपेक्षा १२ टक्के जास्त असेल. त्याचबरोबर खरीप हंगामात देशात दोन लाख ७२ हजार हेक्टरवर टोमॅटोची लागवड करण्याचं उद्दिष्ट असल्याचं कृषी मंत्रालयानं सांगितलं.

<><><><><>

विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडे पूर्ण संख्याबळ असल्यामुळे पक्षाचे दोन्ही उमेदवार निवडून येतील, असा विश्वास राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी आज नंदुरबार इथं वार्ताहरांसमोर व्यक्त केला. पैशाच्या भरवशावरच महाविकास आघाडीनं जास्तीचा उमेदवार उभा केल्याचा आरोपही त्यांनी केला.

लाडकी बहीण ही निरंतर चालणारी योजना असून ३१ ऑगस्टपर्यंत जर कागदपत्रांची पूर्तता करता आली नाही तरी नंतर येणाऱ्या अर्जांचाही अनुदानासाठी विचार केला जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

हिंगोली जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतल्या लाभार्थी महिलेकडून १०० रुपये लाच घेणाऱ्या ग्रामसेवकावर गुन्हा दाखल झाला आहे. यासंदर्भातला एक व्हिडिओ प्रसारित झाल्यानंतर चौकशी करण्यात आली.

चौकशीनंतर कळमनुरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी लिंबाजी बारगीर यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने तयारी सुरू केली आहे. निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवले आहेत. तसंच मतदार याद्यांचं पुनरिक्षण येत्या २४ जुलै पर्यंत चालू राहणार असून त्यात सर्व पात्र मतदारांची नावं आहेत की नाही याची खात्री करुन घ्यावी असं कार्यकर्त्यांना सांगितलं आहे.

**<><><><><><>**

मुंबईत जोगेश्वरी इथल्या कथित भूखंड घोटाळ्याप्रकरणी शिवसेना खासदार रविंद्र वायकर यांच्याविरोधातला तपास बंद करण्याचा अहवाल मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं दिला आहे. मुंबई पोलिसांकडून या प्रकरणी वायकर यांच्यासह त्यांची पत्नी आणि त्यांच्या चार भागिदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, मुंबई महानगरपालिकेच्यावतीनं यासंदर्भात दाखल करण्यात आलेली तक्रार, अपुरी माहिती आणि गैरसमाजावर आधारित होती, असं आर्थिक गुन्हे शाखेनं म्हटलं आहे.

याप्रकरणी दिलेलं पत्र मागे घेण्याचं निवेदन मुंबई महापालिकेनं यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयात दिलं होतं. त्यामुळं याप्रकरणी आधीच क्लिन चिट मिळाली असून मुंबई पोलिसांनी सादर केलेल्या अहवालात नवीन काही नसल्याचा दावा वायकर यांनी केला आहे. सत्याचा विजय झाल्याची प्रतिक्रियाही त्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, यावरुन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारवर टीका केली आहे. वायकरांना क्लिन चीट देणं म्हणजे भाजप भ्रष्ट नेत्यांना पाठिंबा देत असल्याचा आरोप केला आहे.

<><><><><>

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देऊन शासनानं या समाजाबद्दलची आस्था दाखवून द्यावी अन्यथा आगामी काळात राजकीय भूमिका घेऊ, असा इशारा आज आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला. हिंगोली शहरात मराठा आरक्षण जनजागृती शांतता रॅलीच्या वेळी ते बोलत होते.

यावेळी मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ही रॅली सुरू झाली.  यावेळी कडेकोट पोलीस बंदोबस्त होता.

<><><><><>

मराठा आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझेटमध्ये जर कोणत्याही जिल्ह्याचा उल्लेख असेल तर त्याचा आरक्षणासाठी लाभ होणार असून या संदर्भात प्रशासनाकडून माहिती घेतली जात असल्याचं माजी मुख्यमंत्री, खासदार अशोक चव्हाण यांनी आज नांदेडमध्ये सांगितलं. अशोक चव्हाण यांनी काल आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांची भेट घेतली. त्यासंदर्भात ते बोलत होते.

<><><><><>

टाळ-मृदंगाच्या गजरात आज ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीत स्नान घालण्यात आले. नीरा स्नानानंतर माऊलींच्या पालखी सोहळ्यानं पुणे जिल्ह्याचा निरोप घेतला. दुपारी पालखी सातारा जिल्ह्यातील लोणंद मुक्कामी पोहोचली. पालखी आज आणि उद्या लोणंद मुक्कामी असणार आहे.

<><><><><>

आरोग्याची वारी- पंढरीच्या वारी या माध्यमातून आतापर्यंत १ लाख ४६ हजार ८१३ वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा मिळाली आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांना आरोग्य विषयक सेवा सुविधा आणि आरोग्य शिक्षण देण्यात येत आहे. एकूण ४ आरोग्य पथकं सुसज्ज रुग्णवाहिकेसह पालखीसोबत आहेत. पालखी मार्गावर १८६ टँकरद्वारे शुद्ध पाणीपुरवठा सुरू आहे.

<><><><><>

नीट यूजी परीक्षेसंदर्भातल्या समुपदेशनाची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. त्यामुळे माध्यमांमध्ये प्रसारित झालेलं समुपदेशन पुढे ढकलल्याचं वृत्त चुकीचं असल्याचं आरोग्य मंत्रालयाने स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

नीट परीक्षा गैरव्यवहार प्रकरणात सीबीआयच्या ताब्यात असलेल्या लातुरमधल्या संशयित आरोपींच्या कोठडीत वाढ करण्यात आली आहे. आरोपी संजय जाधव आणि जलील पठाण यांची कोठडी आज संपल्यानं त्यांना लातूर न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. यावेळी न्यायालयानं संजय जाधव याला ८ जुलैपर्यंत सीबीआय कोठडी तर जलील पठाण याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

<><><><><>

परभणी इथल्या प्रभावती सायकल रायडर्सचा चमू परभणी ते पंढरपूर सायकल वारीला निघाला आहे. हे त्यांचं वारीचं 6 वं वर्ष आहे. यात ३० सायकलस्वार असून सुमारे ३०० किलोमीटर अंतर तीन दिवसात पार करून ते पंढरपूरला पोहोचणार आहेत.  पर्यावरण संवर्धनासाठी ते ५०० सिड्स बॉल तयार करून रस्त्याच्या बाजूला मोकळ्या जागेत टाकणार आहेत.

<><><><><>

नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाला आज अमरावती जिल्ह्यातल्या धऱणी तालुक्यात सुरुवात झाली. या अभियानात ज्या निकषांची पूर्तता करायची आहे त्यांची माहिती स्थानिक नागरिकांना या कार्यक्रमात देण्यात आली. शिक्षण, आरोग्य, कृषी, पोषण आहार या क्षेत्रांमध्ये शंभर टक्के परीपूर्णता साधण्याचं आवाहन उपस्थित अधिकाऱ्यांनी नागरिकांना केलं.

<><><><><>

भारत आणि झिबाब्वे यांच्यातल्या पाच सामन्यांच्या मालिकेतल्या हरारे इथल्या पहिल्या टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात झिम्बाब्वेनं भारतासमोर विजयासाठी ११६ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. भारताची सुरूवात खराब झाली असून शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या आठ षटकात ४ बाद ३४ धावा झाल्या होत्या. तत्पूर्वी भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेनं निर्धारित २० षटकांमधे ९ बाद ११५ धावा केल्या. रवि बिश्नोईनं सुरेख गोलंदाजी करत चार गडी बाद केले.

<><><><><><>

राईस मिलर्सने केलेल्या संपामुळे धान्याची उचल वेळेत झाली नाही. त्यामुळे धानाच्या वजनात घट झाली असून प्रति क्विंटल ४ ते ५ किलो घट मंजूर करावी, अशी मागणी गोंदियातल्या धान्य खरेदी संस्था चालकांनी सरकारला केली आहे. धानाची घट मंजूर होत नाही तोपर्यंत राईस मिलर्सकडे धान्य भरडाईसाठी देणार नाही, असा इशारा चालकांनी दिला आहे.

<><><><><><>

गोंदिया जिल्याच्या सडक अर्जुनी तालुक्यात तिडका गावातल्या एका शेतात भात रोवणीचं काम सुरू असताना ट्रॅक्टर उलटल्यानं ट्रॅक्टर चालकाचा मृत्यू झाला.

<><><><><><>

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन 2024- 25 या आर्थिक वर्षात शंभर टक्के निधी खर्च होण्यासाठी चोख नियोजन करावं असं आवाहन कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केलं आहे. ते आज कोल्हापूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत बोलत होते. आवश्यक त्या प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर द्याव्यात अशा सूचना त्यांनी केल्या. प्राथमिक शिक्षण, आरोग्य, पिण्याचं पाणी, पंचगंगा प्रदुषण नियंत्रण या कामांबरोबरच जिल्ह्याच्या विकासाचे सर्व प्रलंबित प्रश्न लवकरात

लवकर मार्गी लावण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी दिला जाईल असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><><>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी काल मुसळधार पाऊस झाला. कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात आणि विदर्भात तुरळक ठिकाणी अतिवृष्टीची तर बहुतेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवर याच कालावधीत सोसाट्याचा वारा वाहू शकतो. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा तर बऱ्याच ठिकाणी पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><><>//**